क्र. सकाआ/सुरक्षा/सुधारीत वेतन/343/२०२३
चंद्रपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, चंद्रपूर
सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय,
प्रशासकीय भवन, चंद्रपूर
Email-chandrapurmathadi@gmail.com
दिनांक :- २६.०५.२०२३

*** आ दे श ***

**विषय :- चंद्रपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाचे (कार्यक्षेत्र चंद्रपूर गडचिरोली जिल्हा) नोंदीत सुरक्षा रक्षकांचे वेतन व इतर भत्ते यामध्ये वाढ करणेबाबत.**

संदर्भ :- १. क्र. सकाआ/सुरक्षा/वेतन वाढ/८७१/२०२२ दि १७.१०.२०२२
२. शासन पत्र क्रमांक एसजीए२०२१/प्र.क्र. ८५/काम-५, दिनांक ०२/०५/२०२३

उपरोक्त शासन पत्र क्रमांक एसजीए२०२१/प्र.क्र. ८५/काम-५, दिनांक ०२/०५/२०२३ अन्वये १२ जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाचे वेतन व भत्ते यामध्ये ३ वर्षाकरीता वाढ करण्यास शासन मान्यता प्राप्त झालेली असुन चंद्रपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळातील सुरक्षा रक्षक / सुरक्षा पर्यवेक्षक / सुरक्षा अधिकारी यांच्या मुळ वेतनात रुपये १,२१३/- व त्यावर लेव्ही ४३% टक्केप्रमाणे ५२२/- अशी एकुण एकंदरीत वाढ केलेली आहे. मंडळाच्या पत्र क्र. सकाआ/सुरक्षा/वेतन वाढ/८७१/२०२२ दि १७.१०.२०२२ च्या प्रस्तावाप्रमाणे सुरक्षा रक्षक / सुरक्षा पर्यवेक्षक / सुरक्षा अधिकारी यांच्या प्रवास भत्ता, शैक्षणीक भत्ता व धुलाई भत्ता यामध्ये वाढ झालेली दिसुन येत नसुन त्याबाबत स्पष्टता नाही. तसेच सुरक्षा रक्षकांचे वेतन व भत्ते यामध्ये वाढ कधीपासुन करावयाची याबाबत ही स्पष्टता नसल्याने तुर्तास शासन पत्र क्रमांक एसजीए२०२१/प्र.क्र. ८५/काम-५, दिनांक ०२/०५/२०२३ अन्वये दिनांक ०१ मे २०२३ पासुन सुरक्षा रक्षकांचे मुळ वेतनात रुपये १२१३/- ची वाढ याबाबत शासनाचे वेळोवेळी निर्गमीत होणा-या आदेश निर्देशांस अधिन राहुण तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येते आहे.

चंद्रपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळामार्फत दिनांक ०१ मे २०२३ ते ३० एप्रील २०२६ या तिन वर्षाकरीता वेतनाचे दर पुर्ननिर्धारण केलेले असुन ते खालील प्रमाणे आहे. (चंद्रपूर गडचिरोली जिल्हयाकरीता)

**सुरक्षा रक्षकांचे वेतन भत्ते दिनांक ०१/०५/२०२३ पासुन ३०.०६.२०२४**

| क्रं | पदनाम | मुळ वेतन | विशेष भत्ता | घरभाडे भत्ता १० टक्के दरमहा | प्रवास भत्ता दरमहा | धुलाई भत्ता दरमहा | शैक्षणीक भत्ता दरमहा | एकुण वेतन | देय लेव्ही ४३ टक्के | वेतन व लेव्ही मिळुन एकुण रक्कम (२६ दिवस) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुरक्षा रक्षक | ११,२३४/- | २४४४/- | १३६८/- | ६००/- | ६००/- | ६००/- | १६८४६/- | ५८८२/- | २२७२७/- |
| २ | सुरक्षा पर्यवेक्षक | १२,०६९/- | २४४४/- | १४५१/- | ६००/- | ६००/- | ६००/- | १७७६४/- | ६२४१/- | २४४०५/- |
| ३ | सुरक्षा अधिकारी | १२,८४५ | २४४४/- | १५२९/- | ६००/- | ६००/- | ६००/- | १८६१८/- | ६५७४/- | २५१९२/- |

उपरोक्त दराव्यतीरीक्त सुरक्षा रक्षकांचे वेतनावर खालीलप्रमाणे मुख्य नियोक्त्यास लेव्ही देणे कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक आहे. सर्व नोंदीत मुख्य मालकांना याद्वारे सुचित करण्यात येते कि, त्यांनी मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/सुरक्षा पर्यवेक्षक/सुरक्षा अधिकारी यांचे १ मे २०२३ पासुन वेतन व भत्ते व त्यावरील लेव्ही सुधारीत दराप्रमाणे मंडळाकडे जमा करावी.

Security Guard Board ★ CHANDRAPUR (M.S.) ★

(एम. पी. मडावी)
अध्यक्ष तथा
सहाय्यक कामगार आयुक्त,
चंद्रपूर

प्रत :- माहिती तथा पुढील उचीत कार्यवाहीकरीता.
-----------------------------------------
-----------------------------------------

D:\office data\SGB-sgb-fixation